दि. 19/11/2026

प्रेसनोट

पोलीस उप महानिरीक्षक श्री शहाजी उमाप यांनी ऐकून घेतल्या नागरिकांच्या तक्रारी

दिनांक 19 नोव्हेंबर रोजी पोलीस उप महानिरीक्षक श्री शहाजी उमाप यांनी पोलीस अधीक्षक कार्यालय, परभणी येथे जिल्ह्यातील तक्रारदारांशी संवाद साधला.

आपल्या जिल्हा भेटी दरम्यान, नागरिकांच्या अडीअडचणी समजावून घेऊन, त्यांच्या शिघ्र सोडवणुकीद्वारे पोलीस - नागरिक यांच्यातील 'संवाद' मजबूत करून, लोकाभिमुख कामकाजाद्वारे पोलीस - जनता संबंध अधिक दृढ करण्यासाठी पोलीस उप महानिरीक्षक श्री शहाजी उमाप यांनी नांदेड परिक्षेत्रातील चारही जिल्ह्यांत 'जनसंवाद' उपक्रम सुरू केला आहे.

आज रोजी परभणी जिल्ह्याच्या कामगिरीचा मासिक आढावा घेण्यासाठी पोलीस उप महानिरीक्षक हे सकाळपासून पोलीस अधीक्षक कार्यालयात उपस्थित होते. या दरम्यान, दुपारी 03.00 ते 04.30 या वेळेत त्यांनी जिल्ह्यातील तक्रारदारांशी 'संवाद' साधला. यादरम्यान, एकूण (16) तक्रारदारांनी आपले लिखित अर्ज पोलीस उप महानिरीक्षक यांना सोपविले. यात, मालमत्ता विषयक वाद, मारहाण, दाखल गुन्ह्यांचा तपास, अवैध व्यवसाय इत्यादी तक्रारींचा समावेश आहे. प्राप्त तक्रारींची गांभीर्याने दखल घेऊन, त्यांच्या शिघ्र सोडवणुकीसाठी संबंधित उपविभागीय पोलीस अधिकारी व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांना आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या आहेत.

तक्रारदारांकडून प्राप्त होणाऱ्या अर्जांच्या शिघ्र सोडवणुकीसाठी, पोलीस उप महानिरीक्षक कार्यालयाने यापूर्वीच 'संवेदना' ही तक्रार निवारण प्रणाली सुरू केली आहे. आज रोजी 'जनसंवाद' उपक्रमादरम्यान, प्राप्त झालेले सर्व अर्ज 'संवेदना' पोर्टलच्या माध्यमातून पुढील चौकशी व कार्यवाहीसाठी संबंधित अधिकाऱ्यांकडे वर्ग करण्यात येणार असून, प्रत्येक तक्रारीवर झालेल्या कार्यवाहीचा आढावा नांदेड परिक्षेत्र कार्यालयातील फीडबॅक टीममार्फत घेण्यात येणार आहे.

याप्रसंगी, पोलीस अधीक्षक श्री पंकज कुमावत व जिल्ह्यातील सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी हे हजर होते.

पोलीस उप महानिरीक्षक कार्यालय,
नांदेड परिक्षेत्र, नांदेड